# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** स्वच्छ भारत अभियातंर्गत केंद्र शासनाद्वारे निर्देशित करण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण टुलकिट नुसार शहरातील नागरिकांना कचरा टाकण्याकरीता सुलभ तथा सोईचे होईल या उद्देशाने व्यवसायिक ठिकाणी मुख्य रस्ते, ईतर ठिकाणी Twin Bin ची व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोणतुन १०० लीटर क्षमतेचे ५०० जोडी स्टेनलेस स्टील ट्वीन बीन (Stainless Steel Twin Bin) खरेदी करणे व म.न.पा. द्वारे निश्चित केलेल्या ठिकाणी स्थापित करण्याकरीता रु. ७६,११,०००/- खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करणे व ई-निविदा मागविण्याकरीता तसेच प्राप्त निम्नतम दराच्या आधारे भविष्यात आवश्यकतेनुसार खरेदी व स्थापित करण्याकरीता दोन वर्षे कालावधी करीता दरकरार करण्याचे मान्यतेस्तव व सदर खर्च पद क्र. A ४४२०१२७२२०२ किंवा पद क्र. A २४००१२२०३०१ मधुन भागविण्याचा प्रश्न विचारात घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 151/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 23/11/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार स्वच्छ भारत अभियातंर्गत केंद्र शासनाद्वारे निर्देशित करण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण टुलकिट नुसार शहरातील नागरिकांना कचरा टाकण्याकरीता सुलभ तथा सोईचे होईल या उद्देशाने व्यवसायिक ठिकाणी मुख्य रस्ते, ईतर ठिकाणी Twin Bin ची व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोणतुन १०० लीटर क्षमतेचे ५०० जोडी स्टेनलेस स्टील ट्वीन बीन (Stainless Steel Twin Bin) खरेदी करणे व म.न.पा. द्वारे निश्चित केलेल्या ठिकाणी स्थापित करण्याकरीता रु. ७६,११,०००/- खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करणे व ई-निविदा मागविण्याकरीता तसेच प्राप्त निम्नतम दराच्या आधारे भविष्यात आवश्यकतेनुसार खरेदी व स्थापित करण्याकरीता दोन वर्षे कालावधी करीता दरकरार करण्याचे मान्यतेस्तव व सदर खर्च पद क्र. A ४४२०१२७२२०२ किंवा पद क्र. A २४००१२२०३०१ मधुन भागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**